# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

कृषि नगर वसमत रोड, परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)


---

वाचा- शासन परिपत्रक साप्रवि-२०१८ प्र.क्र.८१/१८ दिनांक ३०.०५.२०१८.

विद्यापीठाअंर्तगत कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या सर्व पत्रव्यवहारावर संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्या सही खाली स्वत:चे नाव/ पदनाम व कार्यालय स्पष्टपणे नमुद करूनच पत्रव्यवहार करणेबाबत...

## परिपत्रक

क्रमाक:२०२३/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८/1647

दिनांक : १३ /०४/२०२३.

प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठांतर्गत विविध कार्यालयाकडून होणारा कार्यालयीन पत्रव्यवहार/ प्रस्ताव मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय तसेच कुलसचिव कार्यालयाकडे प्राप्त होत असतात, मात्र सदरचे प्रस्ताव योग्य माध्यमाध्दारे न पाठविता थेट प्राप्त होत आहेत तसेच सदर पत्रावर/ प्रस्तावावर विभाग प्रमुखाचे/कार्यालय प्रमुखांचे योग्य ते अभिप्राय नमुद केल्या जात नाही, तसेच पत्रावर/प्रस्तावावर केवळ सही करून या कार्यालयाकडे अग्रेषीत करण्यात येत आहेत, संबंधीत प्रस्तावामध्ये काही अडचण उदभवल्यास त्याखाली सही करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची ओळख पटत नाही, सदरील पत्र /प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

सबब, उक्त वाचा येथील शासन परिपत्रकानुसार याव्दारे सर्व कार्यालय प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठांर्तगत कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या सर्व पत्रव्यवहारावर संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या सही खाली स्वत:चे नाव/पदनाम व कार्यालय स्पष्टपणे नमुद करूनच पत्रव्यवहार करावा.

तसेच पत्रव्यवहार/ प्रस्ताव योग्य माध्यमाव्दारे सादर होवून संबंधीत जबाबदार अधिकारी यांनी योग्य तो अभिप्राय नोंदवून आणि योग्य ती मंजूरी घेवूनच सविस्तर प्रस्ताव मा.कुलगुरु महोदय /कुलसचिव कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. परिपुर्ण नसलेले प्रस्ताव परत करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदरचे परिपत्रक संबधीत अधिकारी यांनी आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयास तशा सुचना देवून अवगत करावे.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने..

(धिरजकुमार रा. कदम)
कुलसचिव

प्रतिलीपी :

१.संचालक शिक्षण/संचालक संशोधन/संचालक विस्तार, वनामकृवि,परभणी
२. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता,वनामकृवि,परभणी
३. उप कुलसचिव (आस्था / साप्रवी /विद्या )वनामकृवि,परभणी
४. सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी/सर्व कार्यक्रम समन्वय,केव्हीके,वनामकृवि,परभणी.

प्रत:-

१. प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.
२. मा.कुलगुरु महोदय, यांचे खाजगी सचिव,वनामकृवि,परभणी.